# आत्मचित्र – भाग ४५

(कै. राम गबाले यांच्या 'आत्मचित्र' या आत्मचरित्रात्मक पुस्तकातून क्रमशः)

माझ्या भोवतालच्या वातावरणाचा परिणाम म्हणून एका बाजूला संसाराच्या जबाबदारीची जाण येत चालली होती, तरी माझ्या प्रामाणिक उर्मी माझ्या जीवनात असे हेलकावे देत राहिल्या. चित्रपट व्यवसायात फारसा स्थिर नसतानाही

मी स्वत:शी प्रामाणिक होतो, तरी हे माझं वागणं परिणामी अव्यवहारीच होतं. एस्.पी.कॉलेजच्या मागं विजयानगर कॉलनीत आम्ही राहत होतो. प्रत्येकाकडून काही घ्यावं, शिकावं असा मित्र परिवार. आता दोन्ही मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची स्वतंत्र घडण होत चालली होती. मुलांचं माझ्याशी मित्रत्वाचं नातं जडत चाललं होतं. आपल्या आईबद्दल त्यांच्या मनांत प्रामुख्यानं भक्ती होती. मुलं पुण्यात मॉडर्न हायस्कूलमध्ये शिकत होती. सर, बाई आणि वर्गातल्या मित्रमैत्रिणी, शाळेतले खेळ, गाणी यांबद्दल काय सांगू, आणि काय नको, असं त्यांना होत असे. मुलांच्या बाबतीत मी नेहमीच उत्तम श्रोता असतो. आम्ही जरी पुण्याला राहायला आलो होतो तरी कामासाठी वारंवार मुंबईला बरंच जावं लागत असे आणि आठवड्यातून तीन-चार दिवस तरी डेक्कन क्वीननं प्रवास होत असे. एकदा आमच्या मित्रांपैकी कुणीतरी भाईला विचारलं, "अरे, राम हल्ली कुठं दिसत नाही." भाई म्हणाला, "माहीत नाही, राम हल्ली रेल्वेत असतो. त्याला फक्त युनिफॉर्म घातला नाही तरी चालेल, अशी स्पेशल परवानगी दिली आहे. त्याला भेटायचं तर डेक्कन क्वीनवर जायला पाहिजे."

आमची डेक्कन क्वीन क्वचितच उशिरा येते. पावसाळ्यात कधीकधी उशीर होतो. पण ते अपेक्षित असतं. त्यावेळी माझी गाडी होती आणि कित्येक वेळा मुलं मुंबईहून डेक्कन क्वीनवर शिवाजीनगरला येत असत. देवेन थोडासा मोठा होता. पण रेखा बरीच लहान. ट्रेनमधून उतरून गाडीत बसलो की मुलांची बडबड सुरू होई. आमचे जाधवराव म्हणून ड्रायव्हर होते. ड्रायव्हिंग उत्तम आणि खूप कष्टाळू, विश्वासू, मुलांच्यावर आपलेपणानं लक्ष देत. मुलांची गाडीतील बडबड म्हणजे संबंध दिवसाचा आणि शाळेतला रिपोर्ट असे. मी डेक्कन क्वीनच्या गाडीतल्या गमती सांगायचा, आणि मुलं आपल्या. मुलगा देवेन जास्त बडबड्या, त्याच्याकडे बघून मी ऐकायला लागलो की रेखा, 'बाबा! बाबा!' करून माझी हनुवटी धरून मान वळवून आपल्या शाळेतलं काहीतरी सांगायची. मग मी काहीतरी महत्त्वाचं ऐकल्यासारखं आश्चर्य दाखवून तिच्याकडेच बघून 'असं! अरे वा!' वगैरे असलं काहीतरी म्हणायचा. पण गप्पांत माझं प्रबोधन जास्त होई. त्या विद्यार्थ्यांच्या दिवसभरानंतर तावडीत सापडलेला मी विद्यार्थी असे.

मी कित्येक वेळा रात्री साडेआठ वाजता डेक्कन क्वीननं येऊन घरी मुलांच्या बरोबर जेवत असे. मुलांच्या गप्पा चालूच असत आणि रात्रीच्या पॅसेंजरनं पहाटे मुंबईत पुन्हा पोचत असे. मुलं झोपी गेली, की त्यांना कल्पनाही नसे. पुण्यात आम्ही कायमचे स्थायिक झाल्यानंतर अजून कामासाठी किमान तीन किंवा चार

दिवस मला डेक्कनक्वीननं मुंबईला जाऊन यावं लागत होतं. आता हा कार्यक्रम म्हणजे प्रघातच पडून गेला होता. डेक्कन क्वीननं वारंवार प्रवास घडल्यानं या गाडीवर एक प्रकारचा जिव्हाळा जडला होता.

कारण ती रेल्वे नव्हेच. ती एक निराळीच संस्था होती. अनेक जिवाभावाचे मित्र, त्यांचे वार ठरलेले, पण रोज असणारे आमचे बेअरर्स, लॉरेन्स वाब, सिन्हा किती आमची काळजी घेणारे. घरची माणसं जशी काळजी घेतील, इतक्या जवळिकीचे. कुणाला साखर किती लागते, कुणाला चालत नाही, कुणाला ऑम्लेटबद्दल विचारायचंसुद्धा नाही, कुणाला चहा, कुणाला कॉफी, सगळं त्यांना पाठ. पैसे घ्यायचे राहिले,त्यांच्याकडं सुट्टे नाहीत म्हणून राहिले, कशाचीही चिंता नसे. एकदा माझ्या एका मित्राचं मुंबईला जाणं काही कारणानं रहीत झालं, पण त्यानं दुसऱ्या आपल्या नेहमीच्या मित्राला दादर स्टेशनवर बोलवून घेतलं होतं. थेट व्ही.टी.ला जाणारा. लगबगीनं पुणं स्टेशन गाठून कसाबसा तो ७.१०-१२ पर्यंत प्लॅटफॉर्मवर पोचला. त्यानं लॉरेन्सला हाक मारली आणि त्याच्याकडं एक कागदाचं पाकीट देत म्हणाला, "अरे, लॉरेन्स, चाळीस नंबरला विंडोसीटवर दीक्षित बसतात ना रोज माझ्याजवळ, ते दादर स्टेशनवर येतील, मी आहे का पाहतील, त्यांना एवढं पाकीट दे." मला म्हणाला, "तुझ्याकडे दिलं असतं, पण तू भंगड विसरशील." ठरल्याप्रमाणं लॉरेन्सनं त्यांना दादरला गाठून पाकीट दिलं. दीक्षितानं मला विचारलं, "पंडित का आला नाही?" मी त्यांना सांगितलं, "घरी काहीतरी मुलाच्या अॅडमिशनच्या खटपटीत कॉलेजमध्ये जायचं म्हणाले." दीक्षित म्हणाले, "असं होय! त्याचं काहीतरी इथं वेळेत पेमेंट करायचं होतं, ते पैसे त्यानं पाठवलेत" असा विश्वास, असे संबंध डेक्कन क्वीन परिवारातले होते. एकमेकांचे संबंध जिव्हाळ्याचे होते, मित्रत्वाचे होते, मित्रत्वातल्या मिष्किलपणाचे होते. एखाद्यानं क्रॉफर्ड मार्केटमधून आंब्याची करंडी आणली आणि हमालाकडून वर रॅकवर ठेवून घेतली की साधारणपणे कल्याण निघून गेल्यानंतर कुणीतरी शांतपणानं करंडी उतरवत असत. दुसऱ्यानं लॉरेन्स किंवा बॉबला बशा व सुरी आणायला सांगितलेली असे आणि आंबे कापून आंब्याच्या फोडी करून आसपासच्या मित्रांना वाटल्या जात असत. एक आंबा मात्र कटाक्षानं करंडीत ठेवला जात असे आणि आंब्यांचा धनी शांतपणानं हे पाहत बसलेला असे. शांत न राहून करतो काय? कुणीतरी करंडीतला एकमेव आंबा काढून आंब्याच्या धन्याला दाखवित सांगे, हे घरी घेऊन जा आणि वहिनीला सांग, "असले आंबे आणले होते. म्हणावं, 'मित्रांनी वाटेत खाल्ले.' काय बिघडलं? नाहीतरी घरी येऊन आम्हीच खाणार होतो.

वहिनी काही म्हणणार नाहीत.'' एखाद्यानं दोन छान निराळीच बॉलपेन्स आणली असतील तर बॅग उघडल्यावर ती गेली म्हणूनच समजावी. शेजारचा म्हणे ''बघू बघू छान आहेत रे. ए देशपांडे, हे पेन बघ किती छान आहे.'' असं म्हणत तो शर्टाला लावी आणि पेन्स आणणाऱ्या मित्राला सांगे, ''तुला कुठं मिळतात ठाऊक आहे, पुढच्या खेपेला न विसरता घे हं !''

आमच्या परिवारातलेच एक पासहोल्डर रोज लोणावळ्याला सकाळी लवकर पोचत, काम करून मध्ये मुंबईला येऊन डेक्कन क्वीनला येत. लोणावळ्याला सकाळी लवकर येताना ते दुधाच्या ॲल्युमिनियमच्या कासंड्याचे मोकळे कॅन्स घेऊन येत असत. संध्याकाळी हे दुधाचे दोन कॅन्स त्यांचे नोकर भरून आणत असत आणि ते आमच्या बेअरर्सपैकी कुणीतरी ठेवून घेत असे. शिवाजीनगर स्टेशनवर कॅन्स काढून घेतले जात आणि ते घरी घेऊन जात हा नेहमीचा प्रघात. सहसा लोणावळा गेल्यानंतर कुणी चहा कॉफी मागवत नसे. पण त्या दिवशी एकएक कप साखर घालून गरम दूध लॉरेन्स आणि वाब ठेवायला लागले. कुणी तरी विचारलं, ''हे काय? आता उतरायची वेळ येणार लवकरच.'' उत्तर आलं, ''आजचा दिवस कुठला लक्षांत आहे नं? आज कोजागिरी पौर्णिमा आहे. साऱ्या, लक्षात नाही?'' कासंडीवाल्या साहेबांनी कौतुकानं, ''क्या बात है, आयडिया आहे'' म्हणत दुधावर फुंकर मारत घोट घेतला. थोड्या वेळात शिवाजीनगर आलं. नेहमीप्रमाणं साहेबांचा ड्रायव्हर कासंड्या घ्यायला पुढं झाला. त्याला लॉरेन्सनं हसतचं सांगितलं,''आम्ही विसळून ठेवतो आणि उद्या गाडीतच कॅन्स देतो.''

हे बेअरर्स आमच्याशी जिव्हाळ्यानं वागत ते त्यांना टिप्स भरपूर मिळत असत म्हणून नव्हे, तर खरंच त्यांचं आमच्यावर प्रेम होतं. एके दिवशी अशीच लोणावळा सुटल्यानंतर प्रत्येकासमोर कॉफी आली. इतक्या उशिरा कुणी मागवत नसे. मी लॉरेन्सला जवळ बोलावून विचारलं, ''अरे, आता कॉफी कुणी साठेसाहेबांनी मागवली का?'' लॉरेन्स म्हणाला, ''नाही साहेब, आज कॉफी आमची.'' मी विचारलं, ''म्हणजे?'' ''आज ख्रिसमस इव्ह आहे ना. साहेब, बिल तुम्ही कुणी नाही द्यायचं. साठेसाहेबांनी, आरेकरसाहेबांनी किंवा टिळकसाहेबांनी सुद्धा द्यायचं नाही.''

अलीकडे अमराठी लोक डेक्कन क्वीनच्या पास होल्डर्समध्ये अधिक आहेत. काही अतिशय उमदे सिंधी मित्र, कानडी मित्र असा गोतावळा वाढत चालला आहे. एकदा काय झालं, नेहमी कर्जतच्यापूर्वी बटाटेवडे घेऊन एक बेअरर थोडं

मोठ्यानं 'बटाटेवडा' अशी आरोळी ठोकतच येत असे. त्याबद्दल तो बोलून घेई, पण त्याचा खाक्या बदलायला तयार नाही. एक दिवस मात्र तो अगदी हळू आवाजात 'बटाटेवडा' म्हणत आमच्या कंपार्टमेंटमध्ये आला आणि आश्चर्यानं आमच्यातला एकजण म्हणाला, "अरे! आज काय झालं याला? अगदीच आवाज दवलाय याचा." तो निघून गेल्यानंतर मी माझ्या मित्रांना काका हतरसींची एक कविता सांगितली. मजकूर साधारण असा -

शाळेला सुट्टी पडली होती. आम्ही मुलं गल्लीत विटीदांडू खेळायचे नेहमी. एक तेलवाला 'तेऽऽऽऽऽल' अशी मोठ्यानं आरोळी ठोकत येई. तो इतक्या उंच आणि लांबलेल्या सुरात ओरडे, की पलीकडच्या दोन गल्ल्या सोडून तो आला असला तरी त्याची 'तेऽऽऽऽऽल' ही आरोळी ऐकू येई. तो तेलवाला आपल्या गल्लीत आला, की मुलं त्याच्या पुढं मागं 'तेऽऽऽऽऽल' अशी नक्कल करीत साथ देत असत. त्याची त्या तेलवाल्यालाही गंमत वाटे. सुट्टीचे दिवस होते. मुलं विटीदांडू खेळत असताना एकजण एकदम म्हणाला, "अरे, आजकाल आपला तेलवाला चाचा येत नाही." दुसऱ्यालाही लक्षांत आलं. तो म्हणाला, "अरे, खरंच की कितीतरी दिवस झाले." खरं तर मुलांना का आला नाही बरं, म्हणून मनात काळजी वाटली होती. एवढंच बोलून मुलं पुन्हा खेळात रमली आणि आश्चर्य, तेलवाल्याची आरोळी अगदी हळू दबल्या आवाजात जवळूनच ऐकू आली. खेळ थांबवून मुलं त्याच्या भोवती जमली आणि त्यांनी तेलवाल्याला विचारलं, "अंकल, आप कहाँ थे. आप कैसे है? आपके आवाज को क्या हुआ?" तेलवाला वर न बघताच म्हणाला, "बच्चों, कुछ नही. मेरी शादी हुई है।" माझ्या वदवानी नावाच्या सिंधी मित्राला माझं नावही माहीत नव्हतं. मी मध्यंतरी तीन आठवडे आऊटडोअर शूटिंगला गेलो होतो, म्हणून गाडीला येत नसे. माझ्या त्या सिंधी मित्रानं इतरांना काळजीनं विचारलं, "अरे, आजकल अपना वो तेलवाला अंकल दिखाई नहीं पडता है।" सर्वजण हसले आणि काही दिवस 'तेलवाला' अंकल हेच माझं नांव गाडीत पक्कं झालं.

आमच्या डेक्कन क्वीनच्या कायमच्या पास होल्डर्सपैकी कुणाचं लग्न झालं असेल, तर त्याच्याकडनं पार्टी मागण्याऐवजी गाडीतल्याच खास खाण्याच्या गोष्टी मागवून पार्टी त्यालाच दिली जात असे. एकदा गाडीत हेमंत खऱ्यांना थोडसं अस्वस्थ वाटू लागलं. घाम आला, तर हरी अभ्यंकरसारखा आमचा मित्र दोन डबे ओलांडून डॉ. जोशींना ताबडतोब घेऊन आला. डॉ. जोशींची औषधांची बॅग घेऊन हरी पुढं आणि डॉक्टर मागे असे येऊन पोचले. त्यांनी औषध दिल्यावर खऱ्यांना बरं वाटलं आणि मगच हरी त्यांना जागेवर पोचवून आला.

आमच्या नेहमीच्या बेअररपैकी एकजण या दिवसापासून रिटायर झाला होता. त्या दिवशी त्याला त्याच्या खासगी कपड्यात आम्ही पहिल्यांदा पाहत होतो. त्याला सगळ्यांनी एकत्र करून एक पाकीट तयार केलं होतं. ते पाकीट आणि एक फुलांचा गुच्छ द्यायचा अशी सुधीर गाडगीळची कल्पना. तो त्याच्या निरोपाचे अत्यंत समर्पक असे चार शब्द बोलणार त्यापूर्वी तो बेअरर हे सर्व पाहून एकदम म्हणाला, ''साहब, मै अभी आया।'' म्हणून घाईनं निघून गेला आणि काही वेळानं आपल्या बरोबर आपल्या बायकोला घेऊन आला. ती वयस्कर बाई, डोळ्यांवरचा पदर आणखी पुढं ओढत त्याच्या मागून आली. ती लाजून अगदी चूर झाली होती. सुधीरनं दोघांचं वारेमाप कौतुक करत गुच्छ आमच्या बेअरर मित्राच्या हाती दिला आणि पाकीट मात्र त्या भैय्याच्या बायकोच्या, जणू कानात काही सांगून दिलं आणि 'हम सब लोगोंकी तरफसे' म्हणून नमस्कार केला. त्या भैय्याची बायको पदरानं आपले डोळे टिपत होती.

असं किती काय काय लिहू, या गोतावळ्याबद्दल? या साऱ्या गोतावळ्याचे ज्येष्ठ पालक होते प्रसिद्ध उद्योजक आमचे विसुभाऊ आरेकर. डेक्कन क्वीनवर मी कधी कुणाला पोचवायला गेलोय आणि मी फ्लॅटफॉर्मवर उभं राहून कुणाला टाटा करतोय असं मात्र कधीच घडत नसे. अलीकडेच काही वर्षांपूर्वी डेक्कन क्वीनचं सीझन तिकीट घेणं मी बंद केलं आणि मुंबईला जाणंही बंद केलं, तेंव्हा मात्र डेक्कन क्वीन मला न घेता मला फ्लॅटफॉर्मवरच सोडून निघून गेली. मी तिला टा टा केलं की तिनं मला टा टा केलं हे मला ठाऊक नाही. कारण मला काही चांगलं स्पष्ट दिसलंच नाही.

– कै. राम गबाले

('आत्मचित्र' पुस्तकासाठी भारतातील संपर्क – अरुण जाखडे – २५४४२४५५)